श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑक्टोबर २०२२ | वर्ष-१०, विशेषांक | विनामूल्य खासगी वितरणासाठी | पाने १२

## डेरवण रुग्णालयात अद्ययावत लिनिअर ॲक्सिलिरेटर कार्यान्वित




*'लिनिअर ॲक्सिलिरेटर'चे उद्घाटन करताना डॉ. राजेंद्र बडवे, सोबत डॉ. बाणावली, श्रीमती निशू गोयल, श्री. अशोकराव जोशी, डॉ. देसाई आणि श्री. विकासराव वालावलकर; (डावीकडे) डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. ज्योती यादव, डॉ. सुवर्णा पाटील*

दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी डेरवण रुग्णालयात रुग्णसेवेसाठी तीन महत्त्वाची पावले टाकण्यात आली. पहिले पाऊल म्हणजे, टाटा मेमोरिअल सेंटर, मुंबईचे संचालक डॉ. राजेंद्र बडवे आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी या दोन्ही संस्थांमध्ये झालेल्या एका परस्पर सामंजस्य करारावर सह्या केल्या. या करारानुसार डेरवण रुग्णालयात कर्करोगविषयक उपचारांसंदर्भात परस्पर सहकार्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली. दुसरे पाऊल म्हणजे, डेरवण रुग्णालयात 'न्युक्लिअर मेडिसिन सेंटर'साठी उभारण्यात येणाऱ्या इमारतीचे भूमिपूजन डॉ. बडवे यांच्या हस्ते या वेळीच एका वेगळ्या समारंभात करण्यात आले आणि तिसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे, व्हेरिअन या अमेरिकन कंपनीचा अद्ययावत 'लिनिअर ॲक्सिलिरेटर' रुग्णालयाच्या रेडिएशन डिपार्टमेंटमध्ये कर्करोग उपचार विभागात डॉ. बडवे यांच्याच हस्ते कार्यान्वित करण्यात आला.



*संस्थेच्या कामाविषयीचे सादरीकरण पाहताना पाहुणे*



*सामंजस्य करारावर सह्या करताना डॉ. बडवे आणि श्री. विकासराव वालावलकर सोबत डॉ. मुल्हेरकर, डॉ. बाणावली, डॉ. नाडकर्णी  आणि डॉ. सुवर्णा पाटील*

या समारंभासाठी डॉ. बडवे आणि श्री. वालावलकर यांच्यासह टाटा मेमोरिअल सेंटर, मुंबईचे डायरेक्टर (ॲकॅडेमिक्स) डॉ. श्रीपाद बाणावली, श्रीमती निशू गोयल ('केवट' प्रोग्रॅम प्रमुख, टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई), सद्भावना केंद्र (मुंबई)चे संचालक श्री.विजय आणि श्रीमती सुशीला पापरिवाल, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, ट्रस्टच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. मानसिंग घाडगे (प्राचार्य, वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय) तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील आणि रुग्णालयातील डॉक्टर्स आणि प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी तसेच कर्मचारी, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे स्वयंसेवक, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निमित्ताने संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सद्गुरू श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराजांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून सुरुवात झाली. *''दु:खितांचे दु:ख जावो ही मनाची कामना । वेदना जाणावयाला जागवू संवेदना । दुर्बलांच्या रक्षणाला पौरुषाची प्रार्थना । सत्य, सुंदर, मंगलाची नित्य हो आराधना ।''* ही श्रीसदुरूंची शिकवणच अधोरेखित करणारी प्रार्थना नुपूर, मृणाल आणि स्मरणिका या तीन वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी अत्यंत सुरेलपणे सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारी वैद्यकीय विद्यार्थिनी दिव्या पोखरणकर हिने प्रास्ताविकातच आज कार्यान्वित केलेला 'लिनिअर ॲक्सिलिरेटर' म्हणजे काय याची थोडक्यात माहिती दिली.

'लिनिअर ॲक्सिलिरेटर' हे एक नावीन्यपूर्ण आणि सौम्य, अनाक्रमक स्वरूपात उपचार करणारे उपकरण असून त्याचा 'एक्सटर्नल रेडिएशन थेरपी' देण्यासाठी उपयोग होतो. 'ट्युमर'चे आकारमान लक्षात घेऊन त्याप्रमाणे कमी-जास्त तीव्रतेच्या 'क्ष' किरणांची योजना करण्याची सोय या उपकरणात असल्यामुळे रेडिएशन अगदी अचूकपणे आणि आवश्यक तेवढ्या भागालाच दिले जाते. बाजूच्या निरोगी पेशींना ते कमीतकमी अपाय करते. त्यामुळे या तंत्राने साईड-इफेक्ट्सचा त्रास फारसा होत नाही. व्हेरिअनने पुरविलेल्या या लवचिक आणि अधिक शक्तिशाली तंत्रामुळे, रुग्णाला जास्त लाभदायक उपचार देणे डॉक्टर्सना शक्य होते.

समारंभाचे मुख्य पाहुणे डॉ. राजेंद्र बडवे हे ख्यातनाम कर्करोग तज्ज्ञ असून 'स्तनाचा कर्करोग' या विषयात त्यांनी सुमारे १००० रुग्णांवर मुलभूत संशोधन करून जे निष्कर्ष नुकतेच काढले त्याचा परिणाम म्हणून अशा केसेसमध्ये मृत्युदर २५ टक्क्यांनी घटला आहे. त्यांच्या या क्षेत्रातील कामगिरीबद्दल सन २०१३ मध्ये त्यांना भारत सरकारने 'पद्मश्री' किताबाने सन्मानित केले आहे. टाटा मेमोरिअल सेंटर, मुंबईचे संचालक या नात्याने त्यांनी डिपार्टमेंट ऑफ ॲटॉमिक एनर्जीच्या 'क्लिनिकल ट्रायल सेंटर्स'च्या उभारणीत मोठी मोलाची कामगिरी केली आहे. त्यांचे दोनशेहून जास्त शोधनिबंध विविध शास्त्रीय नियतकालिकातून प्रकाशित झालेले आहेत. डेरवणच्या कर्करुग्ण उपचार विभागाला प्रथमपासूनच त्यांचे मोलाचे सहकार्य लाभलेले आहे. श्री. विकासराव वालावलकर यांनी त्यांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



*सामंजस्य कराराची देवाण घेवाण*



*डावीकडून- डॉ. मुल्हेरकर, डॉ. पाटील, डॉ. नाडकर्णी, श्री. विकासराव वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. बडवे, डॉ. बाणावली आणि श्रीमती निशू गोयल*

डॉ. श्रीपाद बाणावली, कर्करोग तज्ज्ञ, (संचालक, ॲकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर) हे रुग्णालयाच्या स्थापनेपासूनच म्हणजे गेली २५-२६ वर्षे रुग्णालयात कार्यरत असणारे डॉक्टर. कर्करोग विभागाचे आजचे अद्ययावत आणि भव्य स्वरूप हे त्यांच्याच सततोद्योगाचे फलित आहे. टाटा मेमोरिअल सेंटर आणि वालावलकर रुग्णालय यांच्यातील अतूट संबंध हे त्यांच्या प्रयत्नांचे फळ आहे. श्री. विकासराव यांनी त्यांचाही शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

टाटा मेमोरिअल सेंटरच्या श्रीमती नीशू गोयल तसेच सन्माननीय पाहुणे श्री. आणि श्रीमती विजय पापरिवाल यांचेही या वेळी स्वागत करण्यात आले.

संस्थेचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेच्या कार्याची थोडक्यात रूपरेषा देऊन संस्थेच्या वाटचालीविषयी पाहुण्यांना अवगत केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ‘‘जेव्हा २००३ साली डेरवण हॉस्पिटल हे टाटा मेमोरिअल सेंटरचे ‘आउटरिच सेंटर’ बनले तेव्हापासूनच परस्परांचे अतिशय घट्ट असे संबंध निर्माण झाले आहेत आणि तेव्हापासूनच कर्करोग उपचारांसाठी त्यांची आम्हाला सतत मदत मिळत आली आहे आणि त्याबद्दल आम्ही डॉ. बडवे आणि त्यांचे सहकारी यांचे अत्यंत आभारी आहोत.

आज आम्ही ‘लिनिअर ॲक्सिलिरेटर’ आणला असला तरी २००८ सालापासूनच येथे ‘रेडिएशन थेरपी’ने उपचार केले जात होते आणि त्यासाठी जे भाभाट्रॉन कोबाल्ट मशीन वापरले जात होते ते अणू ऊर्जा आयोगाने, सीमेन्स सिम्युलेटर आणि ब्रॅकोथेरपीसह, आम्हाला देणगीस्वरूप दिले होते. त्यामुळे गत १४ वर्षांत आम्ही हजारो रुग्णांना मोफत उपचार देऊ शकलो. या नव्या लिनिअर ॲक्सिलिरेटरचाही त्याचप्रमाणे रुग्णांना उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो. हा विभाग अधिक अद्ययावत करण्यासाठी आता आम्ही ‘सी.टी. सिम्युलेटर’ही आणण्याची योजना करीत आहोत.

हे मशीन खरेदी करताना आम्ही ‘व्हेरिअन’शी खूप घासाघीस करून संस्थेची मोठी रक्कम वाचविली. त्यासाठी टाटा मेमोरिअल सेंटरचे डॉ. जे. पी. अगरवाल (रेडिएशन ऑन्कॉलॉजी विभाग प्रमुख), डॉ. सिद्धार्थ लष्कर, डॉ. वेदांग मूर्ती यांचे आम्ही आभारी आहोत.

आज ‘न्युक्लिअर मेडिसिन सेंटर’चे भूमिपूजन झाले. डॉ. बाणावलींनी सूचना केली की असे केंद्र सुरू केले तर कर्करुग्णांबरोबरच हृद्रोग तसेच अन्य काही आजारांच्या रुग्णांनाही त्याचा फायदा होईल. कोकणातील लोकांसाठी हे केंद्र वरदानच ठरणार आहे. या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर ‘एपिडिमिऑलॉजी सेंटर’(महामारीविज्ञान केंद्र) सुरू करण्याची योजना आहे.

आज आम्ही टाटा मेमोरिअल सेंटरसोबत तांत्रिक मदतीविषयी एक परस्पर सामंजस्य करार केला आहे. आमच्या डॉक्टर्सना प्रशिक्षित करण्यासाठी याची खूपच मदत होणार आहे. हा करार प्रत्यक्षात आणल्याबद्दल आम्ही डॉ. बडवे यांचे अत्यंत आभारी आहोत.

आपणाला कल्पना आहेच की ६० बेड्ससह सुरू झालेल्या या रुग्णालयात आता २५ वर्षांनंतर ६५० बेड्स आहेत. २०१५ साली वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले तेव्हा १०० विद्यार्थ्यांची क्षमता होती. आता आम्ही दरवर्षी १५० मुलांना प्रवेश देतो. शिवाय २०२० पासून पदव्युत्तर शिक्षणासाठी दरवर्षी वेगवेगळ्या ९ शाखांमध्ये ४१ विद्यार्थी अभ्यास करीत आहेत.

आम्ही नर्सिंगचे ए.एन.एम., जी.एन.एम., पी.बी. बी.एस्सी. आणि एम.एस्सी. हे अभ्यासक्रम चालवतो. आणि त्याचा कोकणातील ३ जिल्ह्यातील मुलींना मोठा फायदा झाला आहे. दरवर्षी १५० मुली शिक्षण पूर्ण करून बाहेर पडतात आणि लगेचच मुंबई-पुण्यासारख्या शहरात नोकरी मिळून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होतात. ४० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले 'फिजिओथेरपी कॉलेज'ही आता ट्रस्टने सुरू केले आहे. याशिवाय आम्ही अनेक पॅरामेडिकल कोर्सेसही सुरू केले आहेत. ते महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, महाराष्ट्र आरोग्यशास्त्र विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ यांच्याशी संलग्न आहेत. ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन, डायलिसिस टेक्निशिअन, रेडिऑलॉजी टेक्निशिअन, बायो-मेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन, असे हे अभ्यासक्रम शहरी विभागात त्वरित नोकऱ्या मिळवून देत आहेत.

आमच्या वैज्ञानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही आता 'क्लिनिकल आणि लॅब रिसर्च' या क्षेत्रातही काही काम करीत आहोत. 'सीबीएसइ'शी संलग्न अशी इंग्रजी माध्यमाची शाळाही आम्ही चालवतो. रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची सोय व्हावी या उद्देशाने सुरू केलेल्या या शाळेत आता ९०० विद्यार्थी शिकत आहेत. देशाचे जबाबदार नागरिक निर्माण करण्याच्या दृष्टीने संस्कार करण्यावर आमचा भर आहे.

मुलाची शारीरिक, मानसिक तसेच सर्वांगीण प्रगती होण्यासाठी त्यांनी खेळांमध्ये सहभागी झाले पाहिजे. त्यासाठी 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'ने स्पोर्ट्स अकादमी २०१३ मध्ये सुरू केली. हॉलंडच्या कंपनीने तयार करून दिलेला ४०० मि.चा, आठ लेनचा सिंथेटिक रनिंग ट्रॅक, १० मि. इन्डोअर शूटिंग रेंज, मल्टिगेम हॉल, पोहण्याचा तलाव, धनुर्विद्या, कबड्डी, खो-खोसाठी मोठे बंदिस्त क्रीडांगण, वॉल क्लायंबिंग अशा अनेक सुविधा तेथे आहेत. आता केवळ स्थानिक नव्हे तर राज्य-राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धाही येथे होतात. मोठ्या शहरातून सुट्टीच्या काळात मुले येथे येऊन आठवडा-दोन आठवड्यांची शिबिरे आयोजित करून येथील सुविधांचा लाभ घेतात. आम्ही 'डेरवण यूथ गेम्स' आणि 'डेरवण मॅरेथॉन' प्रतिवर्षी आयोजित करतो. त्याला हजारोंच्या संख्येने प्रतिसाद मिळतो. गतवर्षी 'डेरवण यूथ गेम्स'मध्ये ६००० खेळाडू सामील झाले. हा आकडा दरवर्षी वाढतच आहे.

आमच्या खेळाडूंनी धनुर्विद्या, नेमबाजी, मल्लखांब यामध्ये प्राविण्य मिळवून राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांत पारितोषिके मिळवली आहेत. आमच्या क्रीडासंकुलातील एका मुलीने 'खेलो इंडिया'मध्ये धनुर्विद्येत सुवर्णपदक मिळविले आहे. थोडक्यात, आमच्या ट्रस्टने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात बरीच कामगिरी केली आहे. हा समाजाची, विशेषत: तरुणांची सर्वांगीण प्रगती करण्याचा प्रयत्न आहे, कारण तरुणच या देशाचे भवितव्य आहेत.

ग्रामीण भागात असल्यामुळे आमच्यापुढे खंडित वीजपुरवठा, खराब रस्ते, दुर्गम प्रदेश अशी अनेक आव्हाने आहेत. दूरदूरच्या वस्त्यांवरून रुग्णालयात येणे रुग्णांना त्रासदायक होते. तरीसुद्धा आम्ही येथपर्यंत मजल मारली आहे.

१९६९ साली आमच्या सद्गुरूंनी जेव्हा या ट्रस्टची स्थापना केली तेव्हा ते म्हणाले, 'आत्मज्ञान हे जरी माणसाचे अंतिम



*भूमिपूजन समारंभात डॉ. बडवे*



*भूमिपूजन समारंभात डॉ. बाणावली*




*'लनिअर ॲक्सिलिरेटर'चे उद्‌घाटन करताना डॉ. बडवे, सोबत श्री. अशोकराव जोशी, डॉ. कुलकर्णी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील डॉ. बाणावली आणि अन्य*

साध्य असले तरी जोपर्यंत त्याच्या मूलभूत गरजा भागत नाहीत तोपर्यंत त्याला अध्यात्माविषयी गोष्टी सांगणे निरुपयोगी आहे. आणि केवळ अन्न, वस्त्र, निवारा एवढेच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, रोजगार याही मूलभूत गरजाच आहेत. त्या भागल्या की मग तो तुमचे आध्यात्मिक सिद्धान्त आनंदाने ऐकेल! भुकेल्याला प्रवचन देणे निरर्थक ठरेल.' त्यांच्या या शिकवणुकीप्रमाणेच गेली ५० वर्षे आम्ही वाटचाल करीत आहोत आणि पुढेही करीत राहू.

पण हे 'एकला चलो रे!' पद्धतीने होणार नाही. मोठ्या संस्थांचे सहकार्य आणि मार्गदर्शन नेहमीच आधार देणारे ठरते. देशा-परदेशातील कर्करुग्णांवर उपचार करणाऱ्या सर्व सेवाभावी आणि महत्त्वाच्या संस्थांसाठी टाटा मेमोरिअल सेंटर हे एक दीपगृहच आहे. अशा संस्थेशी असलेल्या आमच्या संबंधांमुळे आम्हाला या भागातील रुग्णसेवेसाठी मोठीच मदत झाली आहे. आणि हेच लक्षात घेऊन आजचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. टाटा मेमोरिअल सेंटरच्या तांत्रिक मार्गदर्शनाने आणि प्रशिक्षणाने आजचे आमचे कर्करोग उपचार केंद्र अद्ययावत करणे हा या कराराचा गाभा आहे. डॉ. बडवे यांनी डेरवण हॉस्पिटलला दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद!

आज लिनिअर ॲक्सिलिरेटर कार्यन्वित झाला, न्युक्लिअर मेडिकल सेंटरचे भूमिपूजन झाले. कर्करुग्णांना सर्वंकष आधुनिक उपचार मिळावेत हीच आमची इच्छा आहे. जर रुग्णांना उपचारासाठी टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये मुंबईला जाण्याची गरज पडणार नाही अशा तऱ्हेने आम्ही येथे उपचार देऊ शकलो तर त्याने टाटा मेमोरिअल हॉस्पिटलवरील भारही कमी होईल आणि आमचा या नव्या सुविधा सुरू करण्याचा हेतू साध्य होईल. आणि मला विश्वास आहे की श्रीसद्गुरूंच्या आशीर्वादाने आमच्या प्रयत्नांना यश येईल.''

यानंतर बोलताना डॉ. बाणावली म्हणाले, ''कॅन्सर हा प्रगत राष्ट्रातील, पाश्चात्य राष्ट्रातील रोग आहे आणि भारतात तो तेवढा महत्त्वाचा प्रश्न नाही असेच आजपर्यंत समजले जायचे. त्यामुळे दुर्दैवाने आजही बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभागच नसतो. पण असा अंदाज केला गेला आहे की २०४० पर्यंत जगभरातील निदान झालेल्या कॅन्सर पेशंटच्या ७० टक्के पेशंट हे गरीब आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशातील असतील. हा निष्कर्ष गंभीर आहे कारण नवीन उपचार पद्धती, नवी औषधे ही शेवटी पाश्चात्य देशातूनच येतात आणि ती बहुतेक औषधे आपल्या पेशंटच्या आर्थिकदृष्ट्या आवाक्यातील नसतात. त्यामुळे आपल्याला जर हा कॅन्सरचा प्रश्न सोडवायचा असेल तर आपल्याला अगदी मुळात काम करावे लागेल आणि अशा परिस्थितीत, अशा वातावरणात हा प्रश्न कसा सोडवायचा याचा विचार करावा लागेल. आणि त्यामुळेच येथे विकसित




डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. राजेंद्र बडवे, श्री. अशोकराव जोशी आणि डॉ. श्रीपाद बाणावली

केलेले हे कर्करोग उपचार केंद्र हे दोन कारणांनी अत्यंत महत्त्वाचे आहे. एक म्हणजे येथे स्थानिक लोकांना स्थानिक पातळीवर उपचार केले जातात. आणि दुसरे म्हणजे मेडिकल कॉलेजशी हे हॉस्पिटल जोडलेले असल्यामुळे येथून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ रोगनिदानाचाच नव्हे तर कॅन्सर पेशंटचे व्यवस्थापन कसे करावे याविषयीही अनुभव मिळेल.

भारतातील ७०-८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात आणि कॅन्सर उपचारांच्या ८०-९० टक्के सोयी शहरात आहेत आणि त्याही मोठ्या शहरात! रुग्ण उपचारासाठी खेड्यातून शहरात जाऊ शकत नाहीत. काही जण जातात आणि उपचार करून घेतात. पण त्यातले काही जण एवढ्या उशिरा पोहोचलेले असतात की उपचार करणे अतिशय कठीण झालेले असते. त्यामुळे ग्रामीण भागात कर्करोगावर उपचार करणारी केंद्रे असतील तर त्याचा जास्त उपयोग होईल कारण त्यामुळे उपचार लवकर सुरू होतील आणि त्याचा चांगला उपयोग होईल.

दुसरं असं की, पूर्वी टाटा मेमोरिअल सेंटर हे एकमेव केंद्र मुंबईत होते. आता आमची देशभर दहा केंद्रं आहेत. पण अजून असे अनेक भाग आहेत जेथे कॅन्सरच्या उपचाराच्या सोयी नाहीत. म्हणून मला असे वाटते की डेरवणच्या धर्तीवर आपण बरीच अशी केंद्रं उभारू शकतो. कारण आपल्याकडे टाटा मेमोरिअल आणि इतर मोठ्या शहरातील रुग्णालयात खूप कुशल माणसे उपलब्ध आहेत. त्यातील पाच टक्के डॉक्टरांनी जरी अशी लहान शहरातील किंवा ग्रामीण भागातली केंद्रांची जबाबदारी घेतली, जशी आत्ता टाटा मेमोरिअल सेंटर १०-१५ केंद्रांची जबाबदारी घेत आहे, तर आणखी १०-१५ केंद्रे सहज सुरू होऊ शकतील आणि त्यामुळे अगदी तळातील पातळीवर बरेचसे प्रश्न सुटू शकतील आणि त्याची अधिकाधिक कॅन्सर पेशंट्सना उपचार देण्याच्या दृष्टीने मदत होईल. त्याचा केवळ पेशंट्सनाच नव्हे तर टाटा मेमोरिअल सेंटरच्या डॉक्टर्सनाही उपयोग होईल. तो असा की, टाटा मेमोरिअल सेंटरमधील माझे सहकारी डॉक्टर्स येथे येतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की येथे अनेक वेळा तिथल्यापेक्षा वेगळ्या प्रकारे उपचार करावे लागतील. आपण 'मेट्रोनॉमिक थेरपी' किंवा 'लो डोस थेरपी'विषयी ऐकले असेल. तर येथे उपलब्ध असलेल्या पायाभूत सोयींचा विचार करून, पेशंटची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन उपचार करताना या डॉक्टर्सना अनेक नव्या गोष्टी, नवी तंत्रे विकसित करता येतात. आणि मला सांगायला अभिमान वाटतो की अशी नवी तंत्रे टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये विकसित होत आहेत आणि आम्ही दोन मौखिक सादरीकरणे ॲस्कोमध्ये (ASCO) केली आहेत, आणि सांगायला आनंद वाटतो की ही उपचारपद्धती



*रुग्णाच्या मनावरील ताण हलका करील अशी नयनरम्य आंतर-सजावट*

आता मुख्य प्रवाहात स्वीकारली जात आहे.

कोणतीही गोष्ट आम्ही करतो त्याविषयी पुरेसे संशोधन होणे जरुरीचे असते आणि डॉ. बडवेंचा संशोधनाला नेहमीच पाठिंबा असतो. आणि तेच आम्ही टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये करीत असतो. अधिकाधिक 'प्रोटोकॉल्स' 'इन्स्टिट्युशनल रिव्ह्यु बोर्ड'कडे पाठविले जातात आणि त्यावर संशोधन होऊन ते उपयुक्त आहेत की नाही हे ठरविले जाते.

आज आपण रेडिएशन सेंटरचे उद्घाटन करतो आहोत. या भागातील रुग्णांचा विचार करूनच येथील उपचार पद्धती ठरविण्यात आली आहे. भाभाट्रॉन २००८ पासून येथे कार्यान्वित झाले. त्याचा फायदा हजारो रुग्णांना झाला. टाटा मेमोरिअल सेंटरमध्येही अजून इतर उपकरणे असूनसुद्धा आम्ही कोबाल्ट मशीन वापरतो कारण नेहमी आढळणाऱ्या 'हेड ॲन्ड नेक' कॅन्सरवर या कोबाल्ट मशीनने सहजपणे उपचार करता येतात. पण असे काही पेशंट असतात की ज्यांना विशेष प्रकारच्या उपचारांची आणि उपकरणांची गरज असते. म्हणून आम्हाला असे वाटले की येथे 'लिनिअर ॲक्सिलिरेटर' आणल्यामुळे येथील उपचार अधिक परिपूर्ण होतील. आणि म्हणूनच श्री. विकासराव वालावलकर आणि श्रीकाकामहाराजांनी येथे 'लिनिअर ॲक्सिलिरेटर' बसविला आहे.



*दीप प्रज्वलन करताना डॉ. राजेंद्र बडवे*



*सद्गुरवे नमः ।*



*डॉ. राजेंद्र बडवे यांचे हार्दिक स्वागत*




*डॉ. बाणवली यांचा सत्कार*

जे टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये आहे ते बहुतेक येथे आहेच. बाकी काय होते? तर 'न्युक्लिअर मेडिसिन फॅसिलिटी'! जरी आम्ही कॅन्सरसाठी पेटस्कॅन मुख्यत्वे वापरत असलो तरी हे जनरल हॉस्पिटल आहे. येथे अनेक रोगांवर उपचार होतात. येथे जसे कॅन्सर पेशंटवर उपचार होतात तसेच येथे थायरॉइडवरही मोठ्या प्रमाणावर उपचार केले जातात. त्यामुळे न्युक्लिअर मेडिसिन आम्ही केवळ कॅन्सर पेशंटच नव्हे तर कार्डिॲक पेशंट, थायरॉइड पेशंट, बोनस्कॅन यासाठीही वापरू शकू. तेही येथेच, त्यासाठी अन्यत्र कोठे जाण्याची गरज नाही. म्हणजे आता येथे कॅन्सर पेशंटवर उपचार करण्याची सर्व आयुधे येथे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे येथे केवळ अधिक पेशंट येतील असे नाही तर त्यांच्यावर अधिक परिपूर्ण उपचार होतील आणि त्यामुळे त्याची फलश्रुती अधिक चांगली होईल. कॅन्सरविरुद्धचे उपचार एकट्याने करता येत नाहीत. पण मला येथे वालावलकरसाहेबांपासून ते डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. देसाई, डॉ. कुलकर्णी आणि समोर बसलेले माझे अनेक सहकारी या सगळ्यांचे हे केंद्र विकसित करण्यासाठी वर्षानुवर्षे सहकार्य मिळाले. त्याचप्रमाणे टाटा मेमोरिअल सेंटरमधील माझे सहकारी यांचेही सहकार्य मिळाले. असे सहकार्य मिळाले तर देशभरात अशी अनेक केंद्रे विकसित करता येतील.'' शेवटी डॉ. बडवे आणि डॉ. गोयल यांनी आपल्या व्यग्र कार्यक्रमातून वेळ काढून येथे उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून डॉ. बाणवली यांनी आपले भाषण समाप्त केले.

यानंतर बोलताना श्रीमती निशू गोयल म्हणाल्या, ''आम्हाला येथे येण्याची संधी दिल्याबद्दल मी डॉ. बाणावलींचे आभार मानते कारण त्यामुळे ही सुंदर संस्था पाहण्याची संधी मला मिळाली. मला एक गोष्ट आपणा सर्वांना सांगायची आहे. २०१७ साली टाटा मेमोरिअल हॉस्पिटलला ७५ वर्षे झाली. त्यानिमित्त एक स्मरणिका काढण्याचा बहुमान मला मिळाला. त्या स्मरणिकेचे विमोचन मा. नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते झाले. संस्था कशी मोठी होते याची कल्पना त्यानिमित्ताने मला मिळाली. थोडक्यात सांगायचे तर अंगीकृत कार्याविषयी बांधिलकी, ध्येयावर समर्पण भावनेने लक्ष केंद्रित करणे आणि वारसा पुढे नेण्यासाठी प्रेरणा आणि चालना देणे हेच संस्था उभारणीचे सार आहे. या संस्थेत ते सगळेच आहे! वालावलकर फॅमिलीने दिलेल्या उत्कृष्ट साहाय्यातून एक मोठी 'स्पेशलाइज्ड' संस्था उभी राहिली आहे. आपण शहरी आणि ग्रामीण असे शब्द नेहमी वापरतो. ही विभागणी आपण लोकसंख्या, उपजीविकेची साधने, शिक्षणाचा स्तर यावर करीत असतो. पण ही विभागणी करणाऱ्या सीमा अनेकदा अस्पष्ट होत आहेत. आरोग्यसेवा आणि आरोग्याविषयीची जागृती याबाबतीतही तसेच आहे. येथे आपणाला अन्यत्रही पाहायला मिळू शकणाऱ्या उत्तम प्रथा पाहायला मिळत आहेत. ही संस्था जगभराच्या संदर्भातही अशा उत्तम प्रथांचे उल्लेखनीय असे उदाहरण ठरेल. त्यासाठी मी मनापासून आपले अभिनंदन करते. तुमच्याकडे पायाभूत सुविधा उत्तम असतील. उत्तम उपकरणे असतील. पण एका मूलभूत गोष्टीची नक्कल करता येणार नाही आणि ती अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचे मनुष्यबळ. आणि येथे त्याची केलेली घडण मनाला उत्साह देणारी आहे आणि मी अशी आशा करते की जगातील अन्य आरोग्यविषयक काम करणाऱ्या संस्थांवरही याचा प्रभाव पडेल. आपले सर्वांचे पुन्हा एकदा अभिनंदन.



*श्रीमती निशू गोयल यांचे स्वागत*



*संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. वालावलकर संस्थेच्या वाटचालीची माहिती देताना*

आम्ही २०१८ सालापासून टाटा हॉस्पिटलमध्ये एक लहानसा कार्यक्रम सुरू केला आहे. त्याचे नाव 'केवट'. केवट म्हणजे नावाडी. हा शब्द रामायणातील आहे. श्रीरामचंद्रांना केवटाने समुद्रपार नेले. त्याचा सारांश असा आहे की केवटने कर्करुग्णाला उपचारादरम्यान साहाय्य आणि आधार द्यायचा. तेच साध्य करण्याचा आमचा प्रयत्न असतो. हे तिसरे वर्ष आहे. आम्ही तीस विद्यार्थ्यांसह सुरुवात केली. आता वेगवेगळ्या शाखातील १६० विद्यार्थ्यांचा ग्रूप तयार झाला आहे. गुणवान विद्यार्थ्यांना फेलोशीप दिली जाते. आम्ही आता एक वर्षाचा 'केवट असिस्टन्ट' नावाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्यामागची कल्पना अशी आहे की एक नवी 'केडर' तयार करावी की जे रुग्णांना रुग्णालयात त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतील. रुग्णांच्या अडचणी वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. कोणाला आर्थिक अडचण असते, कोणाला सामाजिक, कोणाला मानसिक, कोणाला राहण्याच्या व्यवस्थेची; या अडचणी सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करतो. कोविडकाळात आम्ही आमच्या सर्व केंद्रात मिळून तीन लाख रुग्णांना साहाय्य केले. ओपीडीमध्ये नवीन रुग्ण येतात. गेल्या वर्षी अशा एक लाख रुग्णांना आम्ही साहाय्य केले. या वर्षी पहिल्या सहा महिन्यातच हा आकडा एक लाख साठ हजारावर गेला आहे. हा आकडा वाढतच आहे. येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आधार आणि मदत दिली जाईल असा दिवस लवकरच येईल अशी आम्हाला आशा आहे. तेथे संघर्ष असणार नाही, अनुपालन असेल आणि उपचारांची निष्पत्ती चांगलीच असेल! या करारामुळे आपल्यात अधिक समन्वय निर्माण होईल, संपर्क अधिक वाढेल अशी मी आशा करते. आमच्या विद्यार्थ्यांना येथे कशा पद्धतीने काम सुरू आहे हे पाहण्याची संधी दिल्याबद्दल डॉ. सुवर्णा पाटील यांचे मी आभार मानते.''

डॉ. राजेंद्र बडवे यांनी सभेच्या शेवटी आपल्या दिलखुलास वक्तव्याने सर्व उपस्थितांची मने जिंकली. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''.....दर सात-सात वर्षांनी मी येथे येतोय! २००७ ला आलो, २०१५ ला आलो आणि आता २०२२ ला! आणि प्रत्येक भेटीत मला दिसते आहे की हा वृक्ष मोठामोठा होतोय! या वेळी मला तर असं जाणवलं की हा सगळ्यांना मदत करणारा एकच वृक्ष नाही तर येथे 'मल्टिपल' वृक्ष झालेले आहेत. फक्त रत्नागिरीच नाही तर सिंधुदुर्ग, थोडं रायगड, हे सगळं इकडेच येणार आहे. आणि आज हे लिनिअर ॲक्सिलिरेटरचे अनावरण झाले त्या मशिनने रुग्णांना उत्तम ट्रिटमेंट दिली जाईल. त्याचबरोबर 'न्युक्लिअर मेडिसिनची'ची पण सोय होत आहे. आणि ते एकदा सुरू झाले की पेटस्कॅन, बोनस्कॅन हे आले की 'क्रॉनिक डिसिज'साठी म्हणजे मधुमेह, रक्तदाब, कर्करोग या सगळ्यासाठी लागणारी सामग्री, की ज्याच्यामुळे आपल्याला कळू शकेल की रोग कुठल्या प्रकारचा आहे, किती वाईट किंवा किती चांगला आहे, औषधाने तो बरा होणारा आहे किंवा नाही हे सारे यामुळे समजेल. या भागातील लोकांना मग हा जिल्हा सोडून बाहेर जाण्याची गरज बिलकूल भासणार नाही. त्यांनी इथेच यायला पाहिजे. आणि केवळ गोरगरिबांनीच नाही तर सगळ्यांनीच इथे यायला पाहिजे. हे सगळ्यात महत्त्वाचे आहे.




*येथे केवळ अधिक पेशंट येतील असे नाही तर त्यांच्यावर अधिक परिपूर्ण उपचार होतील आणि त्यामुळे त्याची फलश्रुती अधिक चांगली होईल. – डॉ. बाणावली*




*अंगीकृत कार्याविषयी बांधिलकी, ध्येयावर समर्पण भावनेने लक्ष केंद्रित करणे आणि वारसा पुढे नेण्यासाठी प्रेरणा आणि चालना देणे हेच संस्था उभारणीचे सार आहे. या संस्थेत ते सगळेच आहे!– श्रीमती निशू गोयल*

या व्यतिरिक्त एक गोष्ट मला येथे दिसत आहे ती म्हणजे सर्व समाजासाठी काहीकाही गोष्टी तयार होत आहेत. लहान मुलांचं 'न्युट्रिशन' वाढवण्यासाठी, प्रेग्नन्सीमध्ये स्त्रियांचे आरोग्य वाढविण्यासाठी, त्याचबरोबर इन्फेक्शन जसे हळूहळू कमी होत चाललेले आहे, आणि पहिल्या तीस ते चाळीस वर्षांमधले जे रोग आहेत तेही कमी होत आहेत; तसेच कर्करोग, रक्तदाब आणि मधुमेह यावर संशोधन करण्यासाठी या बिल्डिंगमध्ये एक जागा तयार होणार आहे. आणि या सगळ्याचा प्रयत्न एकच राहील की हे रोग समाजात कमीतकमी व्हावेत. मराठीत एक म्हण आहे, 'गरज सरो आणि वैद्य मरो!' वैद्याने स्वत:चा व्यवसाय कमी करण्यासाठी समाजात काम करायचे असते, वाढविण्यासाठी नव्हे! एखादी गाडी किंवा मोबाईल विकायचा असेल तर जास्तीतजास्त लोकांनी तो ब्रॅन्ड वापरावा म्हणून उत्पादक प्रयत्न करील. पण डॉक्टरचे त्याच्या विरुद्ध असते. वैद्यक हा धंदा नाही पण धंद्यासारखा करावा लागतो. म्हणजे काय? तर या समाजाला माझी गरज कमीतकमी लागावी म्हणून मी झटणार आहे. हे करताना मला चांगली पारदर्शकता ठेवली पाहिजे. ते चांगल्या क्वालिटीचे असले पाहिजे. हे सगळे धंद्याचेच निकष आहेत. पार्करसारखे एखादे पेन आपण घेतले तर आपण म्हणतो की हे मला आयुष्यभर पुरेल. त्याचप्रमाणे असं एखादं हॉस्पिटल जे वर्षानुवर्षे, दशके, शतके राहील आणि त्याची क्वालिटी दरवर्षाला सुधारेल. त्या दृष्टीने येथे पावले उचलली आहेत आणि एपिडेमिऑलॉजीचे जे मोठे संशोधन येथे सुरू होणार आहे की ज्याच्यामध्ये कोहोर्ट बघितला जाईल की आज ज्या ४–५–१० वर्षांच्या मुली आहेत त्या ३०–४०–५० वर्षांच्या होतील त्या वेळी त्यांना कुठले रोग होतील आणि आजच्या ब्लडटेस्टमध्ये त्याचे काही सूचन आहे का? आणि ते थांबवता येईल का? असा विचार फार कमी लोक करतात. आणि असा विचार जर येथे केला जात असेल तर या संस्थेचं आयुष्य ३००–४०० वर्षांपेक्षा जास्त असेल!

डॉ. बाणावली म्हणाले की कर्करोग वाढला आहे. तो कमी करण्यासाठी दोन–तीनच गोष्टी करणे आवश्यक आहे. एक म्हणजे तंबाखू! आपल्या शाळांच्या आजूबाजूला तंबाखूची विक्री होता कामा नये. मला एक चांगली गोष्ट आढळली की संस्थेतर्फे या जिल्ह्यातील सगळ्या शाळात जाऊन 'डेंटल केअर' दिली जाते. लहानपणीच मुलांच्या हे मनावर बिंबवले की हे वाईट आहे तर २०–२५–३० वर्षांनी तंबाखूचे सेवन कमी होईल. तोंडाचा, घशाचा कर्करोग कमी होईल. भारतातील ४० टक्के कर्करोग हे तंबाखूमुळे होतात. इन्फेक्शनमुळे होणारे १५ टक्के कर्करोग हे कमीच होत आहेत. धावतं पाणी असेल, शारीरिक स्वच्छता असेल तर हे इन्फेक्शनचे कर्करोग कमी होतात. तसेही आता इन्फेक्शन कमी होत आहे. तिसरं महत्त्वाचं कारण म्हणजे, स्थूलपणा. इथली मुलं बारीक आणि सडसडीत दिसताहेत आणि हे फार चांगलं आहे. मुंबईत जेव्हा शाळांमध्ये कर्करोगाबद्दल सांगायला जातो तेव्हा पाहतो, सगळी मुलं अगदी गरगरीत असतात! आणि तरी सगळ्या आयांचं म्हणणं असतं




*प्रत्येक भेटीत मला दिसते आहे की हा वृक्ष मोठामोठा होतोय! - डॉ. राजेंद्र बडवे*

की मुलगा खात नाही! हे कसं ते मला कळत नाही! हा जो गरगरीत मुलांचा प्रश्न आहे तो पुढे आपणाला भोवणार आहे! मधुमेह, रक्तदाब आणि कर्करोग! स्थूलपणामुळे १९ वेगवेगळे कर्करोग होतात. तेव्हा या तीन गोष्टी कमी करणं महत्त्वाचं आहे. आणि हे सगळं करताना, ज्यांना कर्करोग झाला आहे त्यांना सर्वोत्तम ट्रिटमेंट देणे हेही तितकंच महत्त्वाचं आहे.

आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे जी आम्ही टाटामध्ये करायचा प्रयत्न करतोय! रुग्ण आला की आपण म्हणतो की फार उशीर केलास! पण तो त्याचा दोष नाही. एकतर त्याला त्याविषयी ज्ञान नाही, जागरुकता नाही. दुसरं, मी तिसऱ्या अवस्थेतील रुग्णाला पहिल्या अवस्थेतील रुग्णाइतके बरे करू शकत नाही हा माझा प्रॉब्लेम आहे! ही माझी मर्यादा आहे. माझी मर्यादा मी कबूल करण्याऐवजी त्याच्या डोक्यावर थापतो की तू उशिरा आल्यामुळे मी काही करू शकत नाही. तेव्हा असे काहीतरी संशोधन करायला पाहिजे की ज्यामुळे तिसऱ्या अवस्थेतील रुग्णाला पहिल्या अवस्थेतील रुग्णाप्रमाणेच बरे करता आले पाहिजे! त्या दृष्टीने जेवढे प्रयत्न आपण करू तेवढे चांगले! माझी आजी लहानपणी माझ्याकडून एक गोष्ट वदवून घ्यायची की– दहाव्या वर्षी आईचं बोट सोडायचं. विसाव्या वर्षी खेळण्यांशी खेळणं बंद करायचं. तिसाव्या वर्षी इकडेतिकडे बघणं बंद करायचं. चाळिसाव्या वर्षी संध्याकाळचं जेवण कमी करायचं. पन्नासाव्या वर्षी घराबाहेर शिजवलेले खाण बंद करायचं. आता हे कठीण आहे, नाही का? इतक्या गोष्टी, चाटपासून बाहेर पडलेल्या आहेत! पण प्रयत्न करा! साठाव्या वर्षी आहेत त्याच गोष्टी चालू ठेवायच्या, नवीन काही करायचे नाही. सत्तराव्या वर्षी आंबट पदार्थ कमी करायचे.ऐंशीव्या वर्षी हार्डबेडवर झोपायला सुरुवात करायची. पाठदुखी कमी करण्यासाठी. नव्वदाव्या वर्षी जीवनाविषयी आसक्ती कमी करायची. आणि शंभराव्या वर्षी देवाला नमस्कार करून 'थँक यू' म्हणायचं!''

शेवटी आभार व्यक्त करताना वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील म्हणाल्या, '' जेथे आम्हाला कर्करोगाच्या सर्वेक्षणासाठी गावात येण्याला देखील विरोध होत होता तेथे आज आधुनिक उपचारपद्धतीचा एवढा मोठा टप्पा गाठण्यात आलेला आहे, आणि याचं जेवढं श्रेय संस्थेला आहे तेवढेच ते टाटा मेमोरिअलला जाते! याची सुरुवात डॉ. दिनशॉ यांनी केली. आणि डॉ. राजेंद्र बडवे यांचा त्यात सिंहाचा वाटा आहे. याचं कारण असं आहे की टाटा मेमोरिअल ही संस्था छोट्या संस्थांना आपल्या पंखाखाली घेते, त्यांना उडण्याचे बळ देते आणि त्यांना आकाशात उंच भरारी मारायला लावते! संकुचित दृष्टिकोन न ठेवता त्यांनी अनेक संस्थांना बळ दिलेलं आहे. आम्ही त्यातीलच एक आहोत हे आमचे भाग्य आहे. त्यांनी तांत्रिक साहाय्य, मेडिकल ऑन्कॉलॉजिस्ट पाठविणं,

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५ ६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com




*मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील आभारप्रदर्शन करताना*

हिस्टोपॅथॉलॉजी अपग्रेड करणं अशी मदत केलीच आहे. आमची आता विनंती आहे की त्यांनी रेडिओऑन्कॉलॉजिस्ट सुद्धा पाठवावे म्हणजे हे निरंतर सुरळीत चालेल. काही कोर्सेस सुरू करता येतील. आम्ही त्यांचे शतश: आभारी आहोत आणि कायमच ऋणात राहणार आहोत. डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या नेतृत्वाखाली हा पल्ला गाठला गेला आहे. त्यांनी गेली २५ वर्षे जे निरंतर आणि अविरत कष्ट घेतले त्याचं आज चीज झालं आहे. शेवटी नीशू गोयल यांच्यासह सर्व उपस्थितांचे आभार मानून डॉ. पाटील यांनी सर्वांना धन्यवाद देऊन कार्यक्रमाची सांगता केली.



*श्रोतृवर्ग*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०